# अंमली पदार्थ विरोधी कक्ष, घाटकोपर युनिट
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई

-: प्रेस नोट :-  दि.०६/०९/२०२३

## अंमली पदार्थ विरोधी कारवाईत २८ लाख रूपये किंमतीचे एम.डी.(मेफेड्रॉन) सह ०२ तस्कर अटकेत

| | |
|---|---|
| गु.र.क्र. व कलम | ७८/२३, कलम ८(क) सह २२(ब),२२(क),२९एन.डी.पी.एस.कायदा १९८५ |
| दाखल दिनांक | दिनांक ०६/०९/२०२३ रोजी ०६.३० वा. |
| गुन्हयाचे घटनास्थळ | कमला नगर माहिम (पू) मुंबई |
| आरोपीची संख्या | ०२ |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | एकुण १४० ग्रॅम ''एम.डी.'' (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ अंदाजे कि.रु. २८,००,०००/- |

दिनांक ०६/०९/२०२३ रोजी गुन्हे शाखे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे, घाटकोपर युनिट यांनी गस्ती दरम्यान कमला नगर माहिम (पू) मुंबई याठिकाणी केलेल्या कारवाई अंतर्गत ०२ अंमली पदार्थ तस्करांकडुन एकुण १४० ग्रॅम ''एम.डी.'' (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ अंदाजे कि.रु. २८,००,०००/- चा जप्त केला आहे. दोन्ही आरोपी विरोधात अं.प.वि.कक्ष घाटकोपर युनिटने गु.र.क्र.७८/२३, कलम ८(क) सह २२(ब),२२(क),२९एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल केला असुन आरोपीतांना दिनांक ०६/०९/२०२३ रोजी अटक केली आहे. अटक आरोपीतांना मा. न्यायालयाने दिनांक १२/०९/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केले आहे.

दोन्ही अटक आरोपीत हे सायन, धारावी, माहिम परिसरात गेल्या काही महिन्यांपासुन एम.डी. या अंमली पदार्थाची तस्करी करीत असल्याचे तपासात निष्पन्न होत आहे.

नमुद आरोपी हे अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या कौशल्यपुर्ण कामगिरीमुळे अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या तावडीत मिळून आले. सदर गुन्हयांचा तपास अं.प.वि.कक्ष, घाटकोपर युनिट, गुन्हे शाखा, मुंबई येथील स.पो.नि लोंढे हे करीत आहेत.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर,पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम,पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. शशी कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. प्रकाश जाधव, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई, श्री. काशिनाथ चव्हाण,(अति. कार्यभार) सहायक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, घाटकोपर युनिटचे प्र.पो.नि. लता सुतार यांचे नेतृत्वात अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि. भगवान बेले, स.पो.नि. लोंढे, पो.ह.क्र. ०६१३०६/गांगुर्डे, पो.शि. ०८०५६८/काळे, पो. शि. ०९०७०१/शिंदे, पो.शि.क्र. ०९०२४३/गोमासे, पो.शि.चा. ०९०१३०/जांभळे या पथकाने केली आहे.

--------oo--------